# सध्या सहकारी बँका सुस्थितीत : परिचारक

## ▶▶ समर्थ सहकरी बँकेला आदर्श बँक पुरस्कार; थोब्बी आदर्श व्यवस्थापक

सोलापूर/प्रतिनिधी

सध्याच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहणे खूप अवघड आहे. या परिस्थितीतही सहकारी बँका सुस्थितीत चालू आहेत. आता चांगले कर्जदार मिळणे खूप अवघड असून सध्या एनपीए कमी ठेवणेही महत्त्वाचे आहे, असे मत सहकाररत्न सुधाकरपंत परिचारक यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूरच्या वतीने गुरुवार २६ मे रोजी शिवस्मारक सभागृह येथे आदर्श बँक व आदर्श मॅनेजर पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिचारक बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सुधाकरपंत परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूरचे जिल्हा उपनिबंधक सह. संस्थेचे बी.टी.लावंड होते. यावेळी व्यासपीठावर राजगोपाल मिणीयार, कल्याण काळे, मोहन दाते, किसन माळी, संगीता फाटे, अशोक लुणावत आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.



उत्कृष्ट बँकेचा पुरस्कार सुधाकरपंत परिचारक यांच्या हस्ते स्वीकारताना समर्थ सहकारी बँकेचे चेअरमन दिलीप अत्रे, संचालक प्रशांत बडवे, राजन जांबोटकर आदी.

### देशात सोलापूर जिल्हा १ नंबर

सोलापुरातील ३४ बँका पैकी ३१ बँका सुस्थितीत आहेत. पाच वर्षात सोलापूरची बचत वाढली असून देशात सोलापूर जिल्हा एक नंबर वर आहे. जिल्ह्यात २० पैकी १८ बँकांची निवडणूक बिनविरोध झाली आहे. बँकेच्या कर्ज वसुलीसाठी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

-बी.टी.लावंड (जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था सोलापूर)

प्रथम आदर्श बँक पुरस्कार समर्थ सहकारी बँक , लोकमंगल को. ऑप. बँक, सांगोला को. ऑप. बँक , निशिगंधा सहकारी बँकेला प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर द्वितीय पुरस्कार दि. पंढरपूर को. ऑप. बँक, सोलापूर जनता सहकारी बँक, विकास सहकारी बँक लि., मनोरमा को. ऑप. लि., विद्यानंद को. ऑप. बँक, शिवशक्ती अर्बन को. ऑप.लि. बार्शी, शरद नागरी सहकारी बँक लि., कृषिसेवा नागरी को. बँक लि. कोळे या बँकांना देण्यात आले. व तृतीय आदर्श बँक पुरस्कार दि लक्ष्मी को. ऑप बँक, माढेश्वरी को. ऑप. बँक लि.माढा, सद्गुरू गहिनीनाथ अर्बन को-ऑप बँक लि. अकलूज या बँकेला देण्यात आले. यावेळी आदर्श व्यवस्थापक पुरस्कार समर्थ सहकारी बँकेचे उमेश थोब्बी यांना देण्यात आला.

प्रस्तावना मोहन देशपांडे यांनी केले तर सूत्रसंचालन राजेंद्र कोठावळे यांनी केले.